**कि.फौ.अ.कं. १५७/१६** **नि.कं. १६ पुढे सुरु**

सविता वि. रमेश

**गैरअर्जदारा तर्फे सा.क. १ चा पुढील उलटतपास विद्वान विधीज्ञ श्री. व्ही. एम. क्षिरसागर यांचे मार्फत शपथेवर सुरु. :**

हे म्हणने खरे आहे की, मी जेव्हा गैरअर्जदार क. १ सोबत राहायचे तेव्हा माझा भाउ नेहमी यायचा. हे म्हणने खरे नाही की, जेव्हा माझा भाउ यायचा व तेथे त्याचे मित्र वैगेरे यांची पार्टी व्हायची व त्याकरीता माझे पतीने त्याला तसे न करण्यास सांगितले होते. हे म्हणने खरे नाही की, माझे भावाचे मित्र आमचेकडुन येवुन पार्टी करायचे व त्यांना मी तसे करायचे सांगितले होते. हे म्हणने खरे नाही की, मी गैरअर्जदार क. १ चा अपमान करीत होते व घरचे काम देखील करीत नव्हते. हे म्हणने खरे आहे की, मी गैरअर्जदार क. १ वर त्याचे दुस-या महीलेशी संबंध असल्याचा आरोप केला आहे. हे म्हणने खरे आहे की, गैरअर्जदार क. १ ने मला समजावुन सांगितले होते की, माझेवर तसे आरोपी घेवु नको. साक्षीदार स्वत: सांगते की, गैरअर्जदार नेहमी फोनवर बोलत होता. हे म्हणने खरे नाही की, मी त्यांना खोटया केसमध्ये फसविण्याची धमकी देत होते. हे म्हणने खरे आहे की, मी गैरअर्जदारांविरुध्द पांढुर्णा येथे महीला सेल कडे तक्रार दिली होती. महीला सेल पांढुर्णा येथे सर्व गैरअर्जदार हजर झाले होते. हे म्हणने खरे आहे की, गैरअर्जदार क. १ मला नांदविण्यास घेवुन जाण्यास तयार होता परंतु मी त्याचेसोबत नांदायला जाण्यास नकार दिला. माझे एम. ए. इंग्रजी व एम.एस.डब्ल्यु. एवढे शिक्षण झाले आहे. गैरअर्जदार क. १ हा १२ वी शिकला आहे. हे म्हणने खरे नाही की, गैरअर्जदार क. १ हा कमी शिकल्याने मी त्याला नेहमी अपमानीत करायचे. हे म्हणने खरे आहे की, गैरअर्जदार क. ५ ही गैरअर्जदार क. १ ची बहीण असुन तिचे लग्न माझे लग्नाआधी झाले होते.

प्रश्न : गैरअर्जदार क. ५ ही कोठे राहते?

उत्तर : गैरअर्जदार क. ५ ही नागपुरला राहते, ती पाहुणी म्हणुन पांढुर्णा येथे आली होती.

मी माझे आईवडीलांसोबत दि. १३.०८.२०१६ रोजी माझे माहेरी आली, त्यानंतर मी पांढुर्णा येथे गेली नाही. मी अंगठी सोडुन माझेसोबत इतर सर्व दागिने घेवुन आले होते. मला गैरअर्जदार क. १ ने पाठविलेला नोटीस दि. ०५.०९.२०१६ रोजी मिळाला होता. त्या नोटीसमध्ये गैरअर्जदार क. १ ने मला नांदायला येण्यास सांगितले होते, परंतु मी गेले नाही. हे म्हणने खरे आहे की, मी गैरअर्जदार क. १ हा कंपनीत काम करतो याचा पुरावा दाखल केला नाही. हे म्हणने खरे आहे की, गैरअर्जदार क. १ हा रु. २००/- रोज मजुरीने काम करतो व त्याला जेव्हा काम मिळते तेव्हा त्याला मजुरी मिळते. हे म्हणने खरे आहे की, गैरअर्जदार क. १ ने सौसरला नांदविण्यासाठी केस दाखल केली आहे. त्यामध्ये मी हजर झाली नाही किंवा वकील लावले नाही. साक्षीदार पुन्हा सांगते की, मी त्यामध्ये हजर झाली व माझे वकील देखील हजर झाले.

प्रश्न : गैरअर्जदार क. १ तुम्हाला नांदवावयास तयार आहे, तुमची जायची तयारी आहे का?

उत्तर : नाही.

हे म्हणने खरे आहे की, मला गैरअर्जदार क्रमांक १ सोबत नांदायचे नाही व वेगळे राहुन पोटगी घ्यायचे आहे करीता ही केस दाखल केली आहे. हे म्हणने खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणने खरे नाही की, माझे प्रतिज्ञालेखातील संपुर्ण मजकुर खोटा असुन मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

सा.वा.दा.ब.अ.क.केले,

समक्ष,

(नितेश बी. राठोड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
नरखेड
दि. ०९.०८.२०१९

(नितेश बी. राठोड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
नरखेड
दि. ०९.०८.२०१९

**<u>अर्जदारतर्फे सा.क. १ चा पुढील सरतपास विद्वान विधीज्ञ श्री. आर.ए. बागडे यांचे मार्फत शपथेवर सुरु.</u> :**

आता मला माझा अभिलेखावर दाखल असलेला नि.क. १६ वरील साक्ष प्रतिज्ञालेख दाखविण्यात आला. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन तो माझे सांगण्याप्रमाणे लिहीलेला असुन त्यावर माझी व माझे वकीलांची सही आहे.

आता मला अभिलेखावर दाखल लग्नपत्रीका दाखविण्यात आली, ती तीच असुन लग्नाच्या मुळ पत्रीकेला नि.क्र. १८ देण्यात येते. आता मला अभिलेखावर दाखल कराची पावती दाखविण्यात आली, ती माझे सास-यांच्या नावाने असुन कराराच्या सत्यप्रतीला नि.क्र. १९ देण्यात येते. नोटीसच्या झेरॉक्सप्रतीला आर्टीकल अ देण्यात येते. आता मला अभिलेखावर दाखल असलेल्या मी दिलेल्या नोटीसचा जबाब दाखविण्यात आला, तो तोच असुन त्याला नि.क्र. २० देण्यात येते. पो. स्टे. पांढुर्णाला दिलेली तक्रार दाखविण्यात आली, ती तीच असुन सदर सत्यप्रतीला नि.क्र. २१ देण्यात येते.

आता मला अभिलेखावर दाखल केलेल्या आंडे हॉस्पीटल तपासणी कार्डची झेरॉक्सप्रत दाखविण्यात आली.(प्रस्तुतच्या झेरॉक्स प्रतीला निशाणी देण्यास गैरअर्जदारतर्फे श्री. व्ही. एम. क्षिरसागर यांनी आक्षेप घेतला की, सदर झेरॉक्स प्रतीला निशाणी देता येणार नाही. अर्जदाराचे विव्दान विधीज्ञांनी असे कथन केले की, झेरॉक्स प्रतीला निशाणी देणे न्यायालयावर बंधनकारक आहे त्याचे कारण असे की, त्याबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाचा आदेश आहे आणि सदरच्या आदेशामध्ये झेरॉक्स प्रतीला निशाणी देणे न्यायालयास बंधन कारक आहे. दोन्ही पक्षांचे कथन ऐकले. अर्जदाराच्या विव्दान विधीज्ञांनी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा उल्लेख केलेला आहे परंतु सदरचा आदेश त्यांनी अभिलेखावर दाखल केला नाही. पुढे अर्जदाराचे असेही कथन आहे की, झेरॉक्सप्रतीचे मुळ कागदपत्रे अर्जदाराकडे आहे. जेव्हा मुळे कागदपत्रे अर्जदाराकडे आहे व तिने मुळ कागदपत्रे प्रकरणात दिलेले नाही अशा परिस्थीतीमध्ये जेव्हा मुळ कागदपत्रे अर्जदाराकडे आहे तेव्हा ती मुळ कागदपत्रे न्यायालयात दाखल करु शकते किंवा झेरॉक्स प्रतीला मुळ कागदपत्रांसोबत पडताळणी करु शकते, असे न करता अर्जदाराने झेरॉक्स प्रतीला निशाणी देण्याची प्रार्थना केली. करीता प्रस्तुत कागदपत्रे अर्जदाराच्या ताब्यामध्ये असतांना सदरच्या झेरॉक्सप्रतीला निशाणी देणे योग्य ठरत नाही. करीता भारतीय पुरावा कायदयानुसार झेरॉक्स प्रतीला निशाणी देता येणार नाही. करीता वैदयकीय तपासणीच्या झेरॉक्सप्रतीला आर्टीकल अ देण्यात येते व विरुध्द पक्षाने घेतलेला आक्षेप मान्य करण्यात येते.)

आता मला अभिलेखावर दाखल केलेल्या दोन ७/१२ उतारे दाखविण्यात आले, ते तेच असुन ७/१२ सत्यप्रतीला नि.क्र. २२ व २३ देण्यात येते.

**<u>गैरअर्जदारा तर्फे सा.क. १ चा उलटतपास विद्वान विधीज्ञ श्री. व्ही. एम. क्षिरसागर यांचे मार्फत शपथेवर सुरु.</u> :**

२. हे म्हणने खरे आहे की, मी माझे लग्न झाल्यानंतर माझे पतीच्या संयुक्त कुटूंबात नांदावयास गेली. हे म्हणने खरे नाही की, संयुक्त कुटूंबात माझी नांदायची ईच्दा नव्हती. हे म्हणने खरे नाही की, मी गैरअर्जदार क्र. १ ला तगादा लावला की, आपण वेगळी रुम करुन राहु. हे म्हणने खरे आहे की, मी व गैरअर्जदार क्र. १ भाडयाची रुम करुन वेगळे राहायचो.

**<u>गैरअर्जदार यांचे वकीलांचे तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब</u> :**

सा.वा.दा.ब.अ.क.केले,

समक्ष,

(नितेश बी. राठोड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
नरखेड
दि. १९.०७.२०१९

(नितेश बी. राठोड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
नरखेड
दि. १९.०७.२०१९